नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा


# सेवक वार्ता

जानेवारी-२०२६

वर्ष -७ अंक- ३

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र

## माजी वन मंत्री सुरूपसिंगजी नाईक यांचे वृध्दापकाळाने निधन




माजी वन, परिवहन मंत्री व काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते सुरूपसिंगजी नाईक यांचे नवापूर येथील खाजगी रूग्णालयात दि. २४ /१२/२०२५ बुधवार रोजी वयाचा ८८व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले.

यांच्या पार्थिवावर दिनांक २५ डिसेंबर २०२५, गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या राहत्या गावी नवागाव येथे अंतिम संस्कार करण्यात आले.

ते धुळे-नंदुरबार जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री होते व दादासाहेब नावाने सर्व परीचित होते. त्यांच्या निधनाने द-याखोर्-यातील आदिवासी बांधवांना न्याय मिळवून देणारा बुलंद आवाज आता हरपला आहे. विविध शैक्षणिक संस्था सुरु करुन नवापूरसह नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बांधवांना त्यांनी शिक्षणाची कवाडे खुली करुन दिली. विशेषतः नंदुरबार जिल्ह्यातील विकासात त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. सन १९७८ पासून सलग ८ वेळा ते विधानसभेवर आमदार म्हणून निवडून आले होते. राज्याच्या राजकारणात प्रदिर्घ काळ काम करीत असतांना त्यांनी मंत्री म्हणून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली. माजी मंत्री स्वरुपसिंगजी नाईक यांच्या निधनाने नंदुरबार जिल्ह्यातील राजकारण आणि समाजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. दादासाहेब स्वरुपसिंग नाईक यांचे चिरंजीव श्री.शिरीशकुमार नाईक हे आमदार,नवापूर आहेत.

वन अधिकारी व कर्मचारी यांचे मनात त्यांचे बद्दल वनविभागात सर्वत्र आदर होता व ती सद्भावना दीर्घकाळ टिकून राहिली.



२५ डिसेंबरला मौजे - नवागाव, तालुका-नवापूर, जिल्हा-नंदुरबार येथे काल स्वर्गवासी झालेले महाराष्ट्राचे अनेकदा वनमंत्री पद भूषविलेले आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन, आदिवासी विकास मंत्री म्हणुन राहीलेले कैलासवासी दादासाहेब स्वरूप सिंग हिऱ्या नाईक साहेब यांचे अंत्यविधीला श्री. जयप्रकाश पाटील, कार्यवाह, व सेवक संघाचे धुळे स्थित जेष्ठ सभासद माणिक निकुम, ॲडव्होकेट प्रभाकर वाघ, आर. डी. पाटील यांनी हजर राहून नाईक साहेब यांना सेवक संघ महाराष्ट्र आणि सेवक संघ धुळे शाखा यांचे वतीने प्रातिनिधिक स्वरूपात श्रद्धांजली अर्पण केली. अंत्यविधीस धुळे, नंदुरबारजिल्ह्यातील सेवानिवृत्त वन अधिकारी हजर होते. अंत्यविधी प्रसंगी जवळपास अंदाजे 10000 जनसमुदाय असावा, असे श्री. जयप्रकाश पाटील, कार्यवाह यांनी कळविले आहे.



त्यांच्या सहानुभूतीपूर्वक वागणुकीचे काही दाखले देत सेवक संघ परिवारातर्फे त्यांनाभावपूर्ण श्रध्दांजली.

*अतिशय प्रेमळ, अधिकाऱ्यांना आदराने वागविणारा, अडचणीत असलेल्यांना मदत करणारा, उत्कृष्ट आदरतिथ्य करणारा व सर्व वरिष्ठ अधिकारी यांची जाण ठेवणारा, आदिवासी वनमंत्री आज स्वर्गवासी झाला आहे. – व्ही.टी. पत्की

*वनविकास महामंडळातील 100% वनक्षेत्रपालांचे सहाय्यक व्यवस्थापकपदी पदोन्नतीसाठी वनमत्र्यांनी आग्रहाने पुढाकार घेतला. पी. के. कुलकर्णी.

## निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा

महाराष्ट्र शासनाने ग्रॅच्युइटीची (Gratuity) मर्यादा ₹२० लाख ही केवळ ०१ सप्टेंबर २०२४ नंतर निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच लागू असल्याचा जी.आर. काढला होता.

या निर्णयाला नागपूर उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. यात १ जानेवारी २०१६ ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनाही ₹२० लाखांची ग्रॅच्युइटी मर्यादा लागू असावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली होती.

**न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल:**

दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर उच्च न्यायालयाने ही मागणी मान्य केली आहे!

त्यामुळे आता १ जानेवारी २०१६ ते ३१ ऑगस्ट २०२४ दरम्यान निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनाही वाढीव ग्रॅच्युइटीचा (₹२० लाख) लाभ मिळणार आहे.

## आई-वडिलांचे आई-वडील होता आले पाहिजे

संकलन : प्रविण सरवदे, कराड

एक दिवस येतो आणि दोघांपैकी एकाला घेऊन जातो, जो जातो तो सुटतो, परीक्षा असते मागे राहणाऱ्याची कोण अगोदर जाणार ? कोण नंतर जाणार हे तर देवालाच माहीत, जो मागे रहातो त्याला आठवणी येणं, अश्रू येणं हे अगदी स्वाभाविक असतं.

आता प्रश्न असा असतो की ही आसवं हे रडणं थांबवायचं कुणी ?

मागे राहिलेल्या आईला किंवा वडिलांना कुणी जवळ घ्यायचं ?

पाठीवरून हात कुणी फिरवायचा? निश्चितपणे ही जवाबदारी असते- मुलांची, मुलींची, सुनांची.

थोडक्यात काय तर दोघांपैकी एकजण गेल्यानंतर मुलामुलींनाच आपल्या आई वडिलांचे आईवडिल होता आलं पाहिजे.

लक्षात ठेवा, लहानपणी आई वडिलांनी नेहमी अश्रू पुसलेले असतात, आजारपणात अनेक रात्री जागून काढलेल्या असतात, स्वतः उपाशी राहून, काहीबाही खाऊन आपल्याला आवडीचे घास भरवलेले असतात, परवडत नसलेली खेळणी आणि आवडीचे कपडे घेतलेले असतात.

म्हणून आता ही आपली जवाबदारी असते, त्यांच्या सारखच निस्वार्थ प्रेम करण्याची असं झालं तरच ते जगू शकतील नसता तो माणूस म्हणजे वडील किंवा ती स्त्री म्हणजे आई तुटून जाऊ शकते, कोलमडून पडू शकते.

आणि ही जवाबदारी फक्त मुलं, मुली आणि सुना यांचीच असते असे नाही, तर ती जवाबदारी प्रत्येक नातेवाईकाची, परिचिताची, मित्र मैत्रिणींची सर्वांची असते.

फक्त छत, जेवणखाणं आणि सुविधा देऊन ही जबाबदारी संपत नाही तर अशा व्यक्तींना आपल्याला वेळ आणि प्रेम द्यावेच लागेल तरंच ही माणसं जगू शकतील. आयुष्याचा जोडीदार गमावणं म्हणजे नेमकं काय ? हे दुःख शब्दांच्या आणि अश्रूंच्या खूप खूप पलीकडचं असतं म्हणून अशा व्यक्तींना समजून घ्या, केवळ माया, प्रेम आणि आपुलकीचे दोन गोड शब्द एवढीच त्यांची अपेक्षा असते ती जरूर पूर्ण करा, त्यांच्या जागी आपण आहोत अशी कल्पना करा आणि त्यांना वेळ द्या.उद्या हा प्रसंग कोणावरही येऊ शकतो, म्हणून नेहमी सर्वांशी प्रेमाने, मायेने आणि आपुलकीने वागा,

९९९९

खुपच सुंदर रचना....जीवन शास्त्र सांगीतले आहे या कवितेत... ज्याने कोणी ही रचली आहे त्यांच खुप खुप अभिनंदन आणि विनम्र वंदन...

## ह्याला आयुष्य म्हणावं काय ?

पद, पैसा, प्रतिष्ठा, प्रसिध्दी
लोळण घेतात पायात
बिल गेटची पत्नी तरीही
का घटस्फोट घेते ह्या वयात ?

शिक्षणाने माणूस समृध्द होतो
आम्ही आहोत अजूनही भ्रमात
उच्चविद्याविभूषकांचे मायबाप
मग का असतात वृध्दाश्रमात ?

हा डिप्रेशनचा शिकार
तो आत्महत्या करतो
ज्याला समजावं सेलिब्रिटी
तो एकाकीपणात मरतो

ज्यांनी कमावलं नाव
त्याला आनंद का मिळत नाही ?
काय चाटायचं ह्या मोठेपणाला
नातं आपुलकीचं जुळत नाही

जळजळीत वास्तव सांगतो
तुमचा विश्वास ह्यावर बसणार नाही
गरीब, आडाणी, प्रामाणिक मजूरांचे
मायबाप वृध्दाश्रमात दिसणार नाही

असं नाही त्यांचे घरात
नाहीत वादविवाद
पण घटस्फोट अन् वृध्दाश्रम
बोटावर मोजण्या एवढे अपवाद

आजारी मायबापांचा ईलाज
करतात किडूक मिडूक विकून
पण जिव्हाळ्याची अजूनही त्यांनी
नाळ ठेवली आहे टिकवून

व्यसनी, रागीट, नवरा
त्याला गरीबीची जोड
तरीही त्याची पत्नी बिच्चारी
करतेच ना तडजोड ?

दुःख हलकं करतात
एकमेकांना भेटून
एका शिळ्या भाकरीचा तुकडा
खातात सारेजण वाटून
जेवढी लावतात माया
तेवढंच बोलतात फाडफाड
कितीदा तरी भांडतात
पण कुठे येतो ईगो आड ?
ऊशाशी दगड घेऊन
भर ऊन्हातही झोपी जातो
काळ्या मातीत घाम गाळणारा
बळीराजा कुठं झोपेची गोळी खातो ?
ना तोल ढळतो ना संयम
दुःखातही सावरण्याची आस
कारण अजूनही ह्या माणसांचा
आहे माणूसकीवर विश्वास
पण हल्ली इन्स्टंट रिझल्टचे
आले हे दळभद्री दिवस
देव सुध्दा लगेच बदलतात
जर पावला नाही नवस
एकत्रीत कुटूंब हल्ली
सांगा कुणाला हवं ?
कामा शिवाय वाटतं का
आपण कुणाच्या घरी जावं ?
एकदा तरी बघा जरा
आपल्या आयुष्याचा रोड मॅप
कुणाचं कुणाशी पटत नाही
काय तर म्हणे जनरेशन गॅप
सांगा बरं कुणावर ह्या
विकृत विचारांचा पगडा नाही
घर, बंगला, फ्लॅट असु द्या
दरवाजा कुणाचाही ऊघडा नाही
बहूत अच्छे, बहूत खुब !
क्या बात है ? बहूत बढीया !
एवढ्याओसंडून वाहतात प्रतिक्रिया
जागृत चोवीस तास सोशल मिडीया
आभासी दुनियेची चाले
कोरडी कोरडी ख्याली खुशाली
मोबाईलवर साऱ्या शुभेच्छा
मोबाईलवरच श्रध्दांजली
काय बरोबर ? काय चूक ?
मत मांडण्याचीही सत्ता नाही
तो बंद घरात मरून पडला
वास सुटला तरी शेजाऱ्याला पत्ता नाही
मुलं पाठवले परदेशात
आई संगे म्हातारा बाप कण्हतो
अंत्यविधी उरकून घ्या
पैसे पाठवतो असं पोटचा गोळा म्हणतो
लेकराला पॉकेटमनी, बाईक
अन् भलेही दिली जरी कार
किती छान झालं असतं
जर दिले असते संस्कार ?
होस्टेल, बोर्डींगात बालपणीच पाठवलं
तो तुम्हाला का वागवणार ?
जमीन असो की जिवन
येथे जे पेरलं तेच ऊगवणार
जिवशास्त्र शिकवलं
जिवनशास्त्र शिकवा
चुलीत गेली चित्रकला
सांगा चारित्र्याला टीकवा
त्रिकोण, चौकोन, षट्कोन
ह्याला सांगा विचारेल कोण ?
ज्याचे जवळ नसेल
आयुष्याचा दृष्टीकोन
विपरीत परिस्थीतीतही
जपणूक केली पाहीजे तत्वाची
व्याकरणापेक्षाही अंतःकरणाची
भाषा असते महत्वाची
चुकू द्या चुकलं तर
अंकगणित अन् बीजगणित
माणसांची बेरीज करा
गुण नाहीत पण गुणवत्ता अगणित
प्राणपणाने जतन करावे
नाते शहर, खेडे, गावाचे
मेल्यावरती खांदा द्यायला
असावे चारचौघे जिवाभावाचे
मेल्यावर दोन अश्रू
हीच आयुष्याची कमाई
ज्याने हे कमावलं नसेल
तो आयुष्य जगलाच नाही
मिळून मिसळून वागावं
आनंदानं छान जगावं
तुम्ही सगळी मोठ्ठी माणसं
म्या पामरानं काय सांगावं ?

## देवा जवळच्या दिव्याचे रहस्य

देवाजवळ दिवा का लावावा. आणि कधी लावावा.याच वैज्ञानिक आणि शास्त्रीय कारण नक्कीच वाचा.
दिवसाला एकूण ८ प्रहर असतात. यात दिवसाला ४ व रात्रीचे ४ चे प्रहर असतात. यात दिवा लावायची वेळ महत्त्वपूर्ण मुख्यता त्या दोन असतात सायंकाळ आणि कातरवेळ पण या दोघां मध्ये फरक असते. तो कसा.
दिवसाचा चौथा प्रहर हा सायंकाळ असतो जो ४ ते ७ वाजे पर्यत असतो त्यानंतर पुढे प्रदोष चालू होतो.सुर्य अस्ताची वेळ आणि सुर्य पूर्ण अस्त झाल्यावर सायंकाळ व प्रदोष चालू होण्याची मधली वेळ हीच कातरवेळ असते. जी सध्या 6:45 ते 7:30 आहे. आणि हिच वेळ दिवा लावण्या साठी योग्य सांगीतली आहे म्हणून आपले पूर्वज म्हणायचे ७ च्या आत घरात. सकाळी,सूर्योदयापूर्वी आणि संध्याकाळी सूर्यास्तानंतर ४८ मिनिटांच्या (दोन घटिकांच्या) काळाला संधीकाल असे म्हणतात. संधीकाल हा वाईट शक्तींच्या आगमनाचा काळ.
दिवे का लावावेत हे प्रथम लक्षात घ्यावे.
दिवे लावणे म्हणजे अग्नीस आवाहन करणे.सूर्य मावळल्या नंतर, वातावरणातील प्रकाश व ऊर्जा दोन्ही कमी होते. यामुळे,जे जीवजंतू सूर्यप्रकाशात टिकू शकत नाहीत असे जीव वातावरणात लगेच पसरतात.शरिरात प्रवेश करू शकतात व स्वास्थ्य बिघडवू शकतात. वातावरणात सुक्ष्मजीव असतात

त्यांना आळा घालण्यासाठी ऊर्जेची आवश्यकता असते,सूर्य मावळल्यानंतर ती ऊर्जा, सर्वत्र दिवे लावून मिळवता येते.म्हणून दिवे लावावेत. तसेच प्रकाशाची ही कमतरता भरुन निघते.ही वेळ अत्यंत महत्त्वपूर्ण कारण. बऱ्याचदा वाईट शक्तींचा त्रास हा तिन्ही सांजेच्या वेळी वातावरणाच्या कक्षेत प्रवेश करणाऱ्या वाईट शक्तींना नियंत्रणात घेऊन त्यांच्याकडून वाईट कृत्ये करवून घेतात.म्हणून तिन्ही सांजेच्या वेळीच मोठ्या प्रमाणावर अपघात, हत्या (खून) होतात. या काळाला कातरवेळ म्हणजेच त्रासदायक किंवा विनाशाची वेळ असे म्हणतात.

तिन्ही सांजेच्या वेळी वातावरणात वाईट शक्तींचे प्राबल्य अधिक असते. त्यामुळे वायूमंडलातील या वाईट शक्ती मुलांचे मन आणि बुद्धी यांवर आक्रमण करण्याची शक्यता अधिक असते.वायूमंडलात कार्यरत असणाऱ्या वाईट शक्ती रात्रीच्या काळात मुलांच्या मनात भय (भीती) निर्माण करतात. तिन्ही सांजेच्या वेळी दिवा लावून शुभं करोति व संध्या प्रार्थना म्हटल्या मुळे देहाभोवती व घराभोवती संरक्षक-कवच निर्माण होऊन वाईट शक्तींपासून रक्षण होते. तसेच देवाच्या आशीर्वादामुळे देहात कार्यरत असणारी शक्तीची स्पंदने १२ तास सूर्योदयापर्यंत सूक्ष्मातून कार्यरत रहातात. व मुलांच्या मनातील भीती दूर होऊन त्यांना देवाशी अनुसंधान साधता येते.तसेच मुलांमध्ये क्षात्रवृत्ती वाढण्यास साहाय्य होते.

असे म्हणतात दिवा लावल्यावर कुलदेवता, ग्रामदेवता ह्या राखणदारासोबत फेरफटका मारतात व ज्या घरात दिवाबत्ती लावली जाते तेथे वास करतात व घरातील व्यक्तींना व घराला वाईट स्पंदनांपासून संरक्षण करतात. तसेच कातरवेळ होताच ईशान्य दिशेकडून लक्ष्मी घुबडावर बसून येते व अनेक रुप धारण करुन जेथे दिवा लावणी होते त्या घरात प्रवेश करते. म्हणून तर घुबड पक्षी हा सुद्धा कातरवेळीच बाहेर पडतो. कातरवेळी घुबड दिसला की समजून जायचे लक्ष्मी आजूबाजूला अदृश्य रुपाने वावरत आहे. तुळस आणि लक्ष्मी दोघी एकमेकांच्या सखी आहेत त्या कातरवेळी एकमेकींशी गप्पा मारतात म्हणून कातर वेळी तुळशी जवळ दिवा लावला जातो.

संध्याकाळी ६.३०नंतर केव्हाही दिवा लावावा, दिवा लावल्यावर घरातील सुवासींनीने दिवा लावला की घराचे मुख्य दार उघडून हातात हळद कुंकू घेऊन थांबावे व कुलदेवता, ग्रामदेवता, लक्ष्मीला घरात येण्यासाठी आमंत्रण द्यावे. आणि उंबरठ्यावर हळद कुंकू वाहावे. देवाजवळ आणि तुळशीजवळ दिवा लावून देव अन दिवा यांना नमस्कार करावा.

हल्ली सगळेच कामात व्यस्त. संध्याकाळनंतर सगळे घरी येतात. मग दिवा करायची वेळ चुकते अशा वेळी आल्यावर हातपाय धुवून दिवा नक्कीच करावा. कारण जसं आई वडील मुलांची वट पाहतात की मूलं कधी घरी येतील, तीच वाट आपली कुलदेवता देखील बघत असते, कारण घरातून बाहेर पडल्यावर परत घरी येई पर्यंत आपली जबाबदारी ही ती घेत असते.

पण आता दिवस बदललेले आहेत. संध्याकाळ झाली की वेध लागतात ते बार, पब, क्लबमध्ये बाहेर जाण्याचे. दिवा लावणं तर दूर राहीलं, बिल येत म्हणून घरातील लाईट सुध्दा बंद करून जातात लोक. याचे परीणाम,ते वेगळं सांगायला नकोच आपण पहातच आहोत.

## 'लक्ष्मीची पाऊलं'

---सचिन श. देशपांडे

देवधर आजोबा... गोरेपान, घारे डोळे, मराठी आठाच्या आकड्याचं नाक, वयाच्या मानाने अजूनही डोक्याशी प्रामाणिक राहिलेले केस, चुकूनही कधी दाढीचे खुंटं दिसणार नाहीत अशी केलेली रोजची गुळगुळीत दाढी आणि टेरीकॉट पॅन्टवर घातलेला हाफ बुशशर्ट... शक्यतो प्लेन फिकट रंगाचा. अजिबात न सुटलेलं पोट आणि बघितल्यावर लगेच एकेकाळच्या, आपल्या रुंदीची कल्पना देणारे खांदे नी छाती. थोडक्यात मामला.. 'खंडहर बता रहा है, के इमारत बुलंद थी'... असा.

तर असे हे देवधर आजोबा... घरी एकटेच रहात असत, चार टापटीप ठेवलेल्या खोल्यांच्या फ्लॅटमध्ये. रोज न चुकता मॉर्निंग वॉक कम जॉग. मग एका वरिष्ठ नागरीक संस्थेच्या हॉममध्ये योगा. कुठल्याही कट्ट्याच्या सहाणेवर... चार समदुःखी टाळक्यांच्या खोडाने, म्हातारपणाचं चंदन न उगाळत बसता, तडक घर गाठणं. घरी आल्यावर विदाऊट शुगरचा चहा पिणं, नी आदल्या रात्री त्यांनीच भिजत घातलेलं... वाटीभर मोड आलेलं, कुठलं ना कुठलं कडधान्य खाणं. आन्हिकं आटोपत असतांना, एकीकडे डाळ भाताचा कुकर चढवणं. आणि दुसरीकडे प्राणापलिकडे जपलेल्या ग्रामोफोनवर, हार्डकोअर क्लासिकल ऐकणं. अलिबाबाचा खजिना होता त्यांच्याकडे या गात्या तबकड्यांचा. "भिमसेन जोशी, वसंतराव देशपांडे, कुमार गंधर्व, जितेन्द्र अभिषेकी हे माझे चार खांदे आहेत... तेच मला सोडून येणार"... असं म्हणत ते गमतीत. अंगाची योग्य ती साफसफाई झाली की... अजिबात अघळ पघळ न रेंगाळता, डोक्यावर कॅप चढवून तडक बाहेर पडत. मग बँकांची कामं, पोस्टाची कामं, आणि निरनिराळ्या गुंतवणुकींसदर्भात ट्रेडर्सच्या ऑफिसांतून चकरा. नंतर ठरलेल्या रसवंती गृहातून... एक फुल ग्लास 'विदाऊट बरफ' उसाचा रस, नी मग बॅक टू पॅव्हेलियन.

घरी आल्यावर... डाळ भात किंवा मुगाची खिचडी पैकी ज्या कोणाचा नंबर असेल, त्याने यज्ञकर्म समजून उदर भरण करणे. एकही शीत ताटात मागे न ठेवता, चार घास भूक पोटात ठेऊनच ताटावरुन उठणे. पोटाला तडस लागेपर्यंत तर त्यांनी, बायकोच्या हातचं गरम जेवणही कधी खाल्लं नव्हतं. जेवल्यानंतर मेन डोअर पासून सगळ्या खोल्यांतून फिरुन, किमान अर्धातास शतपावली करणे. मग पु. ल., व. पु., शं. ना. या त्रिकुटापैकी कोणा एकाला चाळता चाळता, छातीशी कवटाळून झोपून जाणे. फक्त तासभरच. मग पुन्हा सळसळ सुरु... दुपारचा एखादा तास शांत राहून, कंटाळलेल्या गुलमोहराच्या झाडासारखी. पुन्हा एक बीनसाखरेचा चहा, नी पुन्हा दोन चपला पायात सरकवून स्वारी उंबरठ्याबाहेर. लायब्ररी, रोटरी क्लब, लायन्स क्लब वगैरे करुन, 'सातच्या आत घरात'. रात्री फक्त फलाहार... आणि एक ग्लासभरुन कढत हळद दुध, त्यात सुंठ नी जेष्ठीमधाची केलेली पावडर घालून. रात्री नवाच्या सुमारास बंद करायच्या सगळ्या गोष्टी... उदा. दारं, पडदे, नळ, दिवे सगळं चोख बंद करुन... न चुकता गजराच्या घड्याळाचा पाचाचा अलार्म लाऊन, डोळेही बंद करुन झोपी जाणं. "गजराचं घड्याळ, बापासारखं कान चिमटीत पकडून उठवतं... मोबाईलचा गजर आईच्या उठवण्यासारखा असतो, प्रेमाने... थांब गsss असं ओरडलो आपण, की दहा मिनिटं चुप्प होणारा"..असं म्हणत ते.स्वतःपुरत्या शिस्तीच्या लावलेल्या कुंपणाआत, देवधर आजोबा राहायचे... ज्याचा इतरांना कधीच त्रास झाला नाही.

तर असे हे देवधर आजोबा... लक्ष्मीपुजनाच्या दिवशी त्यांच्याकडे असलेल्या तीन पावलांच्या ठशांना, खूप मनोभावे पुजत. बाकी मग... लक्ष्मीची मुर्ती / फ्रेम, चांदीचं कॉईन, नोटांचं बंडल वगैरे काहीही पुजत नसत ते. मी एकदा त्यांना विचारलं की... "आजोबा.. हे नक्की काय आहे? ही तीन पाऊलांच्या ठशांची 3D effect frame, इतर दिवशी तुमच्या

पलंगाशेजारील कॉर्नरपीस वर असते. पण लक्ष्मीपुजनादिवशी, तुम्ही ह्याच फ्रेमची पुजा करता. असं का?". तेंडुलकरला जसा बॉलर बॉल सोडायच्याआधीच, त्याच्या ग्रीपवरुन तो कळायचा... तसा माझा प्रश्न तोंडातून फुटायच्याआधीच, माझ्या तोंडावर उमटलेल्या मोठाल्या चिन्हातून त्यांना कळला असावा... ते तयारच होते.

त्या पावलांकडे थरथरतं बोट (ज्याच्या टोकावर अजूनही त्यांनी मला चकवून, एका डोळ्यातून टिपलेला एक थेंब चमकत होता) नेऊन ते म्हणाले..."हे अनुक्रमे माझ्या आईच्या... बायकोच्या... नी एकुलत्या मुलीच्या पाऊलांचे ठसे आहेत. एकीने जन्म दिला..एकीने तिचा जन्म माझ्यावरुन ओवाळला... तर एकीने आयुष्यात येऊन, माझा जन्म सार्थकी लावला. माझ्या तिशीत आई गेली... आणि ती जायच्या आधी, मी तिच्या एका पाऊलाचा ठसा घेतला. त्या वर्षीपासून नित्याने लक्ष्मी पुजनादिवशी, मी तो ठसा पुजू लागलो.मी सत्तरीत असतांना, बायको गेली सोडून मला पाऊण वाटेवरच. मग मी तिच्या पाऊलाचा ठसा घेतला, नी त्यावर्षीपासून एक पाऊल वाढलं पुजण्यासाठी. पाच वर्षांपुर्वी माझी मुलगी मला 'पुन्हा एकदा' सोडून गेली, पण यावेळी कायमची. मग कॅन्सर झालेली ती... हॉस्पिटलमध्ये मरणाशी शेवटचा हात करत असतांना, मी तिच्याही एका पाऊलाचा ठसा घेतला. तिला त्याही परिस्थितीत ते कळलं होतं, आणि तिने हात जोडले होते मला. धाय मोकलून रडलो होतो आम्ही दोघंही त्यादिवशी, शेवटचच. तर गेल्या पाच वर्षांपासून हे तिसरं पाऊलही आलं, या आधीच्या जोडीच्या जोडीला. माझ्या आयुष्यातल्या ह्या तीनच... पण खूप महत्वाच्या बायका, ज्यांचा एकही 'शब्द' मी कधीच पडू दिला नाही. आणि ह्या तीघींनी पडू दिला नाही, माझा 'मान' ही... कधीच. ह्याच तीन बायकांमुळे...माझ्या आयुष्यात सुख आलं, सुबत्ता आली.ह्या तीन पाऊलांतूनच...माझी एकट्याची,माझ्यापुरती लक्ष्मी वसलेली आहे अरे. त्यामुळेच कदाचित मला वेगळी कुठलीही मुर्ती, वा तत्सम काही पुजायची गरजच भासली नाही कधी. आणि आत्तापर्यंत तरी एकंदरीत... कधीच कुठल्याही गोष्टीची वानवा न पडलेली बघता, त्या खऱ्या लक्ष्मीपर्यंतही माझ्या भावना थेट पोहोचल्या असाव्यातसं दिसतंय".

एवढं बोलून, छानसं हसून... देवधर आजोबांनी, एक बत्तासा माझ्या हातावर टेकवला. माझं लक्ष माझ्याच तळहातावर पडलं. आम्ही सामान्य लोकं... 'कराग्रे वसते लक्ष्मी' म्हणत असतांना, एका आजोबांनी स्वतःची लक्ष्मी... फक्त स्वतःच्या माणसांच्या पाऊलांतून शोधली होती.

प्रत्येकाकडेच अशी लक्ष्मीची पाऊलं असतात. परंतू ती वेळीच ओळखून... त्यांची पुजा नाही, तर निदान जाण ठेवता येणंही... त्या प्रत्येकालाच जमू शकेल असं नाही. समाजात सामान्य तऱ्हेने राहूनही, जगायचं मात्र स्वतःपुरतं... असामान्य. हे देवधर आजोबांच्याच शब्दांत सांगायचं तर... "बाहेरुन देवळावर कितीही दिपमाळा सोडता येत असल्या, तरी लामण दिवा मात्र एखादाच ठेवता येतो तेवत... अंधाऱ्या गाभाऱ्यातून. भले लोकांना आपण त्या दिपमाळांतील एक वाटत असू, पण खुद्द देवाला माहित असतं की... आपण तो एक लामण दिवा आहोत, सतत त्याच्या सोबतीला असलेला".

## माझी फोटोग्राफी - ३

**-प्रमोद यादव**

आज तारीख 22.09.2025. फाकडिंग येथील शेर्पा लॉज हॉटेलमध्ये राहण्याची छान सोय झाली होती. त्यामुळे झोप देखील चांगली आली होती. पण नेहमीची सवय पहाटे लवकर उठण्याची असल्याने लवकरच जाग आली होती. उशिरा रात्री पोहोचल्यामुळे आजूबाजूचा परिसर कसा आहे, हा काहीच अंदाज आलेला नव्हता. सकाळी लवकरच सूर्योदयाचे काही फोटो मिळतात का म्हणून कॅमेरा सोबत घेऊन हॉटेलच्या बाहेर आलो. सूर्योदय झालेला नव्हता . हॉटेल शेजारून नदी वाहत होती. दूध कोशी तिचे नाव . नेपाळ आणि भारत जवळपास संस्कृति एकच आहे नावाप्रमाणे नदी दुधासारखे पांढरी शुभ्र पाणी घेऊन धावत होती ,आणि सोबत पर्वतरांग. फोटोसाठी रंगसंगती निसर्गाने छान पैकी अगोदरच तयार केली होती. पाईन वृक्ष आणि नदी आणि पर्वतरांगा यांचे फोटो काढून पुन्हा हॉटेलमध्ये आलो .सर्व कामे उरकली होती.

चहा,नाश्ता करून साडेसातच्या सुमारास नामचे बाजारच्या दिशेने ट्रेक साठी सर्व ग्रुपची सुरुवात झाली. ट्रेक नदीकाठावरून सुरू झाला.वातावरण एकदम छान आणि ट्रेक साठी चांगला मूड आणणारे होते .उत्साह सगळीकडे होता सर्वजण बरोबर निघाल्याने ग्रुप देखील गप्पा मारत मजा करत , नदीच्या वाहणारे पाण्याचे संगीत मस्तपैकी ऐकत चालला होता . ते वाहणाऱ्या पाण्याचे संगीत आमच्या चालण्याला एक गती देत होते. आणि पाईन वृक्षाची गर्द अशी आकाशाला भिडलेली उंच झाडे मस्तपैकी खाली रस्त्यावर सावली तयार करत होते. मन आतुरतेने पुढील रस्त्यावर धावत होते. दोन्ही पाय आणि शरीर त्याला छान पैकी साथ देत होते.

आज आम्हाला फाकडिंग वरून नामचेबाजार या ठिकाणी जवळजवळ 3500 मीटर ऊंचीवर जायचे होते. आजचा ट्रेक सुरुवातीला नदी काठावरून असला तरी पुढे तो मोठी चढण असलेला होता. आणि जरी हा रस्ता वळणावळणाचा असला तरी बऱ्यापैकी दमछाक करणारा होता. साधारण आजचा ट्रेक 15 किलोमीटरचा होता. सात किलोमीटर वर चढण करीत गेल्यानंतर याक आणि तेथील बैल (ज्यांचा रंग काळा आणि शिंगे पुढे बाकदार वळण असलेला) वाटेत वाहतूक करताना आडवे येत असत. काश्मीरमधील 7 लेक ट्रेक करताना तेथे घोडे खेचर यांचा ट्रेकर ला त्रास होत असे. ते इतके वेगात जात असत आणि त्यांचे पाठीवर मोठे सामान असे त्याचा धक्का त्यावेळी आपण उताराच्या दिशेने न थांबता विरुद्ध दिशेला थांबणे गरजेचे असे. कारण जर धक्का लागला तर कोणी घसरला तर तो उतराचे बाजूला जोरात पडणारच .नदीकाठाच्या ट्रेक असला तरी काही ठिकाणी होणारी चढण खूप दमछाक करणारी होती. त्यामध्ये खूपच त्रास होत असे. नेपाळमध्ये या ट्रेकवर अनेक ठिकाणी झुलते पूल बनवलेले आहेत. असाच आता आम्ही हिलरी झुलता पूल क्रॉस करणार होतो.

झुलता पूलावरून एखादा फॉरेनर (परदेशी नागरिक ) जर तगडा मजबूत शरीर यष्टी असलेला असेल आणि तो जर जोरात चालत गेला तो पूल अगदी जोरजोरात हेलकावे घेत असे . इतका जोरात हलत असे की माझ्यासारखा लगेच शेजारी असणाऱ्या तारेच्या रोपला घट्ट पकडत असे. आणि मग हळूहळू तो पूलावरून चालत जात असे . पण त्यावरून जाणारी जनावरे म्हणजे याक आणि तेथील या बैल हे अगदी त्या पुलावरून नेहमीच्या सवयीने सहजपणे जात असे. या पुलाचे नाव हिलरी संसपेन्शन असं होतं. पूल चांगला लांब होता . पुलाचे मध्यावर आल्यानंतर खाली पाहिल्यावर खूप खोलवर नदी वाहताना दिसत होती . खाली पाहिले पोटात चांगलाच गोळा आला . खाली नदीकडे न पाहता , काही न करता सरळ हळूहळू तारेच्या रोपला धरून इकडे तिकडे न पाहता पुढे जाणे सगळ्यात उत्तम . कारण तसा तो फुल क्रॉस करणे एक दिव्य स्वरूपाचे असे . हे तरंगते पूल चांगले बनवलेले आहेत. त्यामुळे

चालतानाचे खूप मोठी चढण कमी करतात. तसा हा अनुभव तसा खूपच खतरनाक असा होता.हे पूल मजबूत आहेत . तो तसा थोडाच पडणार होता का? पण तो जोरात हलू लागला की चांगलीच पाचावर धारण बसत असे. तो पूल क्रॉस केला आणि मी मदतनीसाकडून कॅमेरा घेतला आणि त्या पुलाचे फोटो काढले मदतनीस सपण खूपच चांगला होता. सपनला देखील कॅमेऱ्याचे बऱ्यापैकी मी माहिती ज्ञान दिले .पुल क्रॉस झाल्यानंतर आमच्या ग्रुपमधील सगळ्या उत्साही मंडळांनी तेथे मस्त पैकी डान्स केला. पंधरा मिनिटे डान्स झाल्यानंतर आता पुन्हा मोठी चढण आणि दमछाक करणारा नामचे बाजारचा ट्रेक सुरू झाला.

अत्यंत हळुवारपणे वर चढत होतो. ऑक्सिजन विरळ होत चालला होता. साधारण साडेचार च्या सुमारास नामचे बाजार येथे आम्ही पोहोचलो. तेथे पोहोचल्यावर थकवा चांगलाच जाणवत होता . नामचे बाजारच्या एन्ट्री पाईटला जिथे स्तूप आहे, तेथेच बराच वेळ आम्ही बसलो. आमचा आजचा मुक्काम हॉटेल हिल टेन नामचे बाजार ला होणार होता. सहा वाजण्याच्या सुमाराला आम्ही नामचे बाजारपेठेतून चालत जाऊन हॉटेलमध्ये पोहोचलो. अगोदरच आमचे सामान तेथील आमचे मदतनीस यांनी आणून ठेवलेले होते. रूम वाटप झाल्यामुळे लागलीच आमचे सामान घेऊन आम्ही आमच्या रूममध्ये गेलो.

बऱ्यापैकी आवरून, पुन्हा फ्रेश होऊन आम्ही हॉटेलच्या मोठ्या हॉलमध्ये म्हणजे जो डायनिंग हॉल आहे तेथे आलो. कारण त्या हॉलमध्ये गरम हीटर बसवलेले होते आणि सगळी टीम आल्यानंतर गप्पा मारण्याला देखील एक चांगलाच रंग चढला होता . मस्तपैकी तेथे जेवण झाल्यावर आम्ही तिथेच गप्पा मारीत बसलो .इंटरनेटची सोय तेथे असल्याने कॅमेरा बॅटरी चार्जिंग करण्याचे आणि इंटरनेटची सेवा असल्याने पाचशे रुपये नेपाळी चलन मधले (48 तासांसाठी )भरून इंटरनेट कनेक्शन बॅटरी चार्जिंगला लावली. 50 रुपये गरम पाण्याचे ग्लास साठी द्यावे लागत असत . आणि बिसलेरी बोटल साठी 300 रुपये ध्यावे लागत असत .तेथे जेवणात राईट, फ्राइड राईस,ऑम्लेट, ब्रेड, नूडल्स, काही बर्गर असे देखील असे. पण जसजसें वरील हवामानात गेलो तसे जेवण कमी होऊ लागले होते. उद्याचा दिवस विश्रांतीचा दिवस होता. हवामानाशी शरीर सुसंगत करावयाचे होते .आणि ट्रेक साठी पुन्हा शरीर तंदुरुस्त ठेवायचे होते.म्हणून तो महत्त्वाचा असा आम्हाला दिलेला विश्रांतीचा दिवस हा सत्कारणीच लावायचा होता. तरी देखील त्यादिवशी जरी सत्कारणी लावायचा असला तरी 300 मीटरचा छोटा ट्रेक करायचा होता.हा विचार करून रूममध्ये आलो निद्रा देवीची प्रार्थना करून झोप कशी चांगली येईल असा विचार करून झोपी गेलो.

क्रमशः ....











(क्रमश:)

# *म्हैस*

लेखक: अनामिक, पुणेकर

मी रोजच दुपारी बावधन या भागात मुलीकडे जातो व संध्याकाळी साधारण सात -साडेसातला तिथून निघून घरी येतो.

परत येताना बहुतेक वेळा स्कूटर किंवा कार असते, पण कधी कधी येताना पायी येतो किंवा अर्धे अंतर बसने येतो व पुढे चालत जातो.

साधारण एक महिन्यापूर्वीची गोष्ट आहे.

त्या दिवशी बसने जायचे होते. घरून सव्वासातला निघालो. साधारण ५-७ मिनिटे चालत गेलो की मुख्य रस्ता लागतो व रस्ता ओलांडला की बसचा थांबा आहे. ट्रॅफिकच्या गर्दीच्या वेळी पुण्यात कुठलाही रस्ता ओलांडणे हे एक दिव्यच असते. मी जाऊन रस्त्याच्या अलीकडे उभा राहिलो व रस्ता कधी ओलांडता येईल याची वाट बघत थांबलो. त्या दिवशी ट्रॅफिक जरा जास्तच होता. या रस्त्याची खासियत अशी आहे की पुणे विद्यापीठ ते व्हाया पाषाण रोड- व्हाया चांदणी चौक-पौड रोडच्या डेपोपर्यंत म्हणजे साधारा ५-६ किमी अंतरामध्ये कुठेही सिग्नल नाही. त्यामुळे सगव्याच गाडय़ा वेगाने एखादा लोंढा यावा अशा येत होत्या. एखाद्या कारखान्याच्या चिमणीमधून जसे धुराचे लोट बाहेर पडत असतात तशाच कार-स्कूटर-मोटारसायकल व बस रस्त्याच्या दोन्हीकडून जात-येत होत्या. बहुधा २-३ मिनिटे गेली की एखादी बारीकशी गॅप मिळते व त्यामध्ये जीव मुठीत धरून रस्ता क्रॉस करता येतो. आज काय प्रकार होता माहीत नाही, मध्ये गॅप येतच नव्हती. बऱ्याच वेळा मी ४-५ पावलं पुढे जायचो आणि वेडय़ा-वाकडय़ा येणाऱ्या गाडय़ांना घाबरून परत मागे यायचो. पण पुढे जाण्याची माझी हिंमत होत नव्हती. वाट बघता बघता १० मिनिटे झाली पण 'नो चान्स'. अशा वेळेस वाटते की, काहीतरी कारण घडून ट्रॅफिक जाम व्हावा, त्यामुळे आपोआपच क्रॉस करणाऱ्यांची सोय होते. पण तसेही काही आज घडत नव्हते. १० मिनिटांनंतर मी होतो त्याच ठिकाणी होतो. तेवढय़ात माझी नजर मागे गेली. मागे एक तगडी म्हैस उभी होती व तिच्या गळ्यातली दोरी धरून मुलगा उभा होता. म्हशीकडे बघताच मी मनातल्या मनात 'युरेका' म्हणून ओरडलो. मी लगेच मुलाकडे गेलो.

मी : अरे, म्हैस घेऊन पलीकडे चलणार का?

मुलगा : कशाकरता, काय करायचं आहे?

मी : करायचं काहीच नाही. फक्त पलीकडे माझ्याबरोबर चालायचे आणि लगेच परत यायचे. हे घे ५ रुपये.

मुलाला काहीच अर्थबोध झाला नसावा, पण ५ रुपये मिळणार व करायचं काहीच नाही हे त्याला समजले.

मुलगा : चला.

म्हशीला ट्रॅफिकशी काहीच देणे- घेणे नव्हते. मुलगा म्हैस घेऊन निघाला, मी म्हशीची ढाल करून तिच्या उजव्या बाजूने रस्ता क्रॉस करायला सुरुवात केली. इतक्या धुवाधार ट्रॅफिक असूनही मी मजेत रस्ता ओलांडत होतो. अर्धा रस्ता ओलंडल्यानंतर मी क्षणभर घाबरलो होतो, कारण आता ट्रॅफिक माझ्या बाजूने यायला सुरुवात झाली व म्हैस माझ्या डावीकडे होती. काही वाहन चालकांनी म्हशीकरिता कर्कश हॉर्न वाजवले, काहींनी म्हशीला मनात शिव्या दिल्या असतील.

आम्ही थाटात पलीकडे पाहोचलो. मी त्या मुलाला ५ रुपये दिले व त्याचे आभार मानले.

पलीकडे चार वयस्कर क्रॉस करण्याकरता उभे होते. मला इतक्या आरामात रस्ता क्रॉस करताना बघून सगळेच मुलाला म्हणाले,अरे आम्हाला पण पलीकडे सोड. आम्ही २-२ रुपये देऊ. लगेच मुलाने म्हैस मागे वळवली व चौघांना पलीकडे सोडले. मी शेजारीच नवीन तयार केलेल्या बस थांब्यावर जाऊन बसलो.

रस्त्यावरचा ट्रॅफिक मगाशी होता तसाच टॉप गीअरमध्ये सुरू होता. सहजच माझं लक्ष पलीकडून येणाऱ्या म्हशीकडे गेले. दोन वयस्कर माणसे म्हशीच्या आडोशाने रस्ता ओलांडत होती. म्हशीच्या फेऱ्या सुरू झालेल्या पाहून मजा वाटली आणि लक्षात आलं की म्हशीबरोबर रस्ता क्रॉस करणं यासारखा सुरक्षित पर्याय नाही. तेवढय़ात त्या मुलाचं लक्ष माझ्याकडे गेलं व लगेच त्याने आनंदाने हात हलवला. बहुधा मनामध्ये मला थँक्स म्हटलं असावं. मी पण हात हलवून त्याच्याशी 'संवाद' साधला. तेवढय़ात माझी बस आली. मी निघालो.

नंतर साधारण महिनाभर माझी जा- ये स्कूटरने सुरू होती. स्कूटर असली की जाणा-येण्याचा माझा रस्ता थोडा बदलतो.

मग आज बसने जाण्याकरता मी बावधनहून निघालो. चालत मुख्य रस्त्याला पोहोचलो. साडेसातची वेळ असल्यामुळे दोन्ही बाजूंनी सुसाट गाडय़ा धावत होत्या, सगळीकडून हेडलाइट डोळ्यांवर येत होते, कर्कश हॉर्न वाजत होते. काही दुचाकी उलट दिशेने जा-ये करत होत्या, काही फूटपाथवरून जात-येत होत्या. थोडक्यात म्हणजे पुण्यातल्या कुठल्याही हमरस्त्याचे चित्र समोर होते. चित्रातला एक रंग मिसिंग आहे हे पटकन लक्षात आलं, आणि तो म्हणजे मुठीत जीव घेऊन रस्ता क्रॉस करताना कुणीच दिसत नव्हते.

मी मनात म्हटले की, हे सगळे गेले कुठे? तेवढय़ात माझे लक्ष बाजूलाच उभ्या असलेल्या म्हशीकडे गेले आणि म्हशीबरोबरच्या मुलाचे लक्ष माझ्याकडे गेले. बघताच मुलाने हात हलवला व ओरडला, 'काका, चला पलीकडे सोडतो, फ्रीमध्ये, पैसे द्यायचे नाहीत.'

माझ्या डोक्यात महिन्यापूर्वीच्या घटनेची टयूब पेटली, 'आपण याला म्हशीबरोबर रस्ता क्रॉस करण्याचे ५ रुपये दिले होते.' मुलगा मला थांबा असे म्हणाला व धावत जवळच्या फुलवाल्याकडून एक फुलांचा गुच्छ घेऊन आला. मला गुच्छ देऊन मला नमस्कार केला व म्हणाला, 'चला.' आम्ही दोघं लगेच म्हशीच्या एका बाजूने रस्त्यावर उतरलो व चालायला लागलो.

महिन्यापूर्वी गेलो होतो तेव्हा म्हैस थोडी बिचकत होती. आज ती एकदमच तरबेज झाल्यासारखी दिसत होती. आपल्याकडे सिग्नल तोडणारे, उलटीकडून येणारे, फूटपाथवर गाडय़ा घालणारे जेवढे कंफर्टेबल असतात तेवढीच. चालता चालता...!

मी : अरे म्हशीला घेऊन इकडे काय करत होता?

आणि मला हा फुल गुच्छ कशा करता दिला?

मुलगा : गेल्या वेळेला आपण भेटलो त्या दिवसापासून रोजच या वेळेला इथे असतो आणि रोजच तुमची वाट बघत होतो.

मी : कशाकरता ?

मुलगा : तुम्हीच मला हा मार्ग दाखवला. संध्याकाळी म्हशीला घेऊन रोज इथे येतो व रस्ता क्रॉस करणाऱ्यांची मदत करतो. गेल्या १० दिवसांपासून याच रोडवर आता ८ म्हशी सोडल्या आहेत. घरचे सगळेच २-३ तास थांबतात. रोजचे एका म्हशीमागे साधारण ८० ते १०० रुपये मिळतात.

या वेळेला म्हशींना काहीच काम नसतं. त्यांची खाण्यानंतरची शतपावली होते. रात्री झोप पण छान लागत असेल. त्यामुळे दूध पण वाढलं आहे.

मी : ट्रॅफिक कमी असेल तर ट्रिपा मिळत नसतील !

मुलगा : काका, ट्रॅफिक कमी असताना गाडयावाले फार स्पीडनी आणि वेडय़ावाकडय़ा गाडय़ा हाकतात. त्यामुळे माझ्या ट्रिपांना मरण नाही. अगदी दुपारी, सकाळी लवकर, किंवा रात्री ९ नंतर अगदीच बेताचा असतो. तेव्हा मीच येत नाही.
मी : वा, क्या बात है!

तेवढय़ात आम्ही पलीकडे पोहोचलो. तिथे ५-६ वयस्क स्त्री-पुरुष उभे होतेच. मुलाने लगेच त्यांना माझी ओळख करून दिली, 'यांनीच ही कल्पना दिली, वगैरे'.

मी मनातून जरा आनंदलो व देवाचे आभार मानले. सगळ्यांनी माझे आभार मानले.

तिघा जणांनी मला बाजूला घेतले व मुलाला सांगितले, ''आम्ही पुढच्या ट्रीपला येतो. तू जा पुढे".

एक जण : तुम्ही आमचा व आमच्या घरच्यांचा फार मोठा प्रॉब्लेम सोडवला आहे. आता घरून बाहेर पडताना बायको बजावते, 'म्हैस असेल तरच रस्ता क्रॉस करा, २-४ रुपये जाऊ देत.'

दुसरी व्यक्ती : पूर्वी रोज रस्ता ओलांडताना समोर म्हशीवर बसलेले यमराज दिसायचे. आता त्यांची म्हैसच बरोबर असते. त्यामुळे एकदम 'बि -न – धा- स'

तिसरी व्यक्ती : आमच्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या पुढच्या मीटिंगला आम्ही तुम्हाला बोलावू. तुमचा सत्कार आम्हाला करायचा आहे. नक्की यायचं आहे. तुमची म्हशीची कल्पना म्हणजे, तोड नाही.

फोन नंबरची देवाण- घेवाण झाली.त्यांचा निरोप घेऊन मी स्टॉपवर पोहोचलो.

## वाचक प्रतिक्रिया -सेवक वार्ता, ऑक्टो-२०२५

- Sevak Warta is fabulous. -विश्वास सावरकर
- उत्कृष्ट अंक. -संजय जगताप
- सदाहरित वार्ता अंक. वन संवर्धन व पर्यटन शासनाचे प्रस्तावित धोरणावर विवेचन सुंदर केले आहे. श्री.गवळींचे अभिनंदन. –व्ही. टी. पत्की
- नेहमीप्रमाणे उत्तम . - एम. एम. कुलकर्णी
- अतिशय परिपूर्ण माहितीपूर्ण अंक. विशेषतः बांबू धोरणात्मक निर्णय, वन्यप्राणी पिके नुकसान बाबतीत शेतकरीवर्गास अनुकूल व्यवस्थापन, कँपा निधी मधून होणारी निधी ची वाढ . श्री यादव सरांची माझी फोटोग्राफी सफर लाजवाब. अभिनंदन गवळी साहेब. - पी.एन. कुकडोलकर

## निधन वार्ता

१. राजेंद्र विनायक गोळे, निवृत्त वि वअ यांचे दि. १८ डिसें. २५ रोजी संध्याकाळी, गोपालनगर, नागपूर येथील निवासस्थानी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. अंत्यसंस्कार २० डिसें. रोजी अंबाझरी घाट, नागपूर येथे करण्यात आले. सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली

२. प्रवीण प्रभाकर गवारे.रा. वरखेडे, तालुका चाळीसगाव, यांचे दि. २०-१२-२०२५ रोजी सायंकाळी अकाली निधन झाले. ते वनपाल,पदावर गौताळा ऑट्रम अभयारण्य येथे कार्यरत होते. २०१७ मध्ये मौजे वरखेडे ता. चाळीसगाव येथे मानव बिबट संघर्ष जोरात सुरू होता, तेव्हा गवारे तेथे आरा गिरणी तपासणी पदावर कार्यरत असतांनाही सलग २/३ महिने सुरू असलेल्या मोहिमे साठी दिवस रात्र वरिष्ठांनी सांगितलेल्या सर्व नियोजन मेहनतीने पार पाडले होते.
वन विभाग नक्कीच त्यांच्या कार्याला लक्षात ठेवेल.सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

३.बबन रामभाऊ पाचपोर,से.नि. उप वन संरक्षक, यांचे दि.१८-१२-२०२५ रोजी दुःखद निधन झाले. १९६७-१९६९ तुकडीचे ते सहाय्यक वन संरक्षक होते. दि.३१-०१-२००३ रोजी ते भारतीय वन सेवेतून निवृत्त झाले होते. शांत, अबोल,मनमिळावू स्वभावाचे ते अधिकारी होते. त्यांना सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

४. मोहनराव शंकरराव भोसले, सेवानिवृत्त सवसं यांचे दि. २-१-२०२६ रोजी सकाळी निधन झाले असे त्यांचे चिरंजीव अमोल यानी कळविले. (1965-67 SFRC batch). त्यांना सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

५. रमण श्रीराम गो-हे सेवा निवृत्त सहा. व्यवस्थापक, वन विकास महामंडळ यांचे वयाच्या ८२ वर्षी दि. ८-१-२०२६ रोजी आकस्मिक निधन झाले. ते किनवट वन प्रकल्प विभागात कार्यरत होते. एक मनमिळाऊ अधिकारी म्हणुन त्यांची ख्याती होती. हे दुःखद वृत्त कळताच तेथील सर्वच कर्मचाऱ्यांनी आपल्या संवेदना व्यक्त करुन भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांना सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

६. दिलीप खंडू निकम, सेवानिवृत्त वनमजूर, चाळीसगाव, यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी शनिवार दि. १७/१/२०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. दशक्रिया विधी, गंधमुक्त व उत्तरकार्य दि.२६/१/२०२६ रोजी राहत्या घरी आदर्श नगर, धुळे रोड, ग्रामसेवक कॉलनी, चाळीसगाव, येथे करण्याचे योजिले आहे. त्यांना सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

### जयप्रकाश पाटील,धुळे यांनी लिहलेला मृत्युलेख

दिलीप निकम यांचा स्वर्गवास झाल्याचे समजले. खूप दुःख झाले. दिलीप निकम हे आमचेकडेस चाळीसगाव वनक्षेत्रात रोपवाटिकेवर कायम वनमजूर म्हणून कार्यरत होते. अत्यंत प्रामाणिक आणि आज्ञाधारक व्यक्ती होते. सकाळीं ५ ते ७ वाजेच्या दरम्यान नळाला पाणी येत असे. वेळेवर न चुकता, पाऊस असो वा थंडी अगदी वेळेवर येऊन पाणी भरणे, झाडं झुड करणे, दळण दळून आणणे, किरकोळ बाजार करुन आणणे,पोराला शाळेत सोडून येणे,शाळेतून घेऊन येणे अशी कामे प्रामाणिक पणे करत असे. चोरी, चपाटी नाही. त्याच प्रमाणे माझे पत्नी बरोबर पिशव्या घेऊन भाजीपाला आणणे, अशी कामे करत असे. Rfo चे घरातील कोणतीही बातमी बाहेर सांगत नसे. अश्या व्यक्ती मदतीला असल्यामुळे वनाकडे सेवेत लक्ष देणे सहज होत असे.
त्यांचे श्रमाचे मोल खूप मोठे असते. पण गेल्या ३० वर्षात सारख्या बदली आणि घरगुती व्यस्ततेमुळे त्यांची आणि माझी भेट चाळीसगाव सोडल्यावर झाली नाही. जीवनाच्या प्रवासात अनेक चांगल्या भेटलेल्या व्यक्ती मधील "व्यक्ती" होती. गीत रामायणात ग. दी. माडगूळकर म्हणतात की,
"दैव जात दुःख भरता दोष ना कुणाचा,
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा"
त्यांचे आत्म्यास सद्गती लाभो ही प्रार्थना करतो.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६